ज्येष्ठ साहित्यिक पु.ल.देशपांडे यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने स्टँडअप कॉमेडी स्पर्धेच्या ठिकाणी पु.ल.जत्रोत्सव आयोजित करण्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण-८२१९ /प्र.क्र.७२/सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २० जून, २०१९

<u>वाचा :</u>- १) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र.संकीर्ण-८२१८/प्र.क्र.२५७/ सां.का.४, दिनांक ६ डिसेंबर, २०१८.
२) संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. सां.का.सं/११३६, दिनांक ८ एप्रिल, २०१९.
३) शासन ज्ञापन, मराठी भाषा विभाग, क्र. संकिर्ण-२०१९/प्र.क्र.३३/भाषा-३, दि. ३० एप्रिल, २०१९.
४) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र.संकीर्ण-८२१९/प्र.क्र.७२/ सां.का.४, दिनांक ३१ मे, २०१९.
५) संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. सां.का.सं/२१२९, दिनांक १२ जून, २०१९.
६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. मावज २०१५/प्र.क्र.३२४/३४, दिनांक १४ जुलै, २०१६

<u>प्रस्तावना :-</u>

उपर्निर्दिष्ट संदर्भ क्र. १ अन्वये ज्येष्ठ साहित्यिक/नाटककार/संगीतकार पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगुळकर, सुधीर फडके यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्याअंतर्गत ज्येष्ठ साहित्यिक, नाटककार व चित्रपट अभिनेते पु. ल. देशपांडे यांच्या व्यक्तिमत्वाच्या विविध पैलूंचे दर्शन जनतेस घडविण्यासाठी राज्य शासनामार्फत ३६ जिल्ह्यांत स्टँडअप कॉमेडी स्पर्धेचे आयोजन करण्यास उपर्निर्दिष्ट शासन निर्णय क्र. ४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. उपर्निर्दिष्ट क्र. ५ अन्वये संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांनी सदर स्पर्धेच्या ठिकाणी पु.ल.जत्रोत्सव आयोजित करण्याचे प्रस्तावित केले असून या जत्रोत्सवातून ३६ जिल्ह्यामध्ये पु.ल.व्यंगचित्रांचे ऑडीओ व्हिज्यूअल्सचे फिरत्या रथाच्या माध्यमातून प्रदर्शन व स्टँड अप कॉमेडी स्पर्धेची जाहिरात त्या-त्या जिल्ह्यांच्या ठिकाणी करण्याचे प्रस्तावित केले आहे. ३६ जिल्हयात पु.ल. जत्रोत्सव आयोजित करण्यास मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

ज्येष्ठ साहित्यिक, नाटककार व चित्रपट अभिनेते पु. ल. देशपांडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने राज्यातील ३६ जिल्ह्यात स्टँडअप कॉमेडी स्पर्धेची पु. ल. जत्रोत्सव रथाद्वारे जाहिरात करण्यासाठी येणाऱ्या खालील नमूद तपशिलानुसार रुपये ६६,५९,९२०/- (अक्षरी रू. सहासष्ट लाख एकोणसाठ हजार नऊशे वीस फक्त) इतक्या रकमेच्या ढोबळ खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	खर्चाची बाब	रक्कम
१.	३६ जिल्हयांचे स्टँड अप कॉमेडीच्या स्पर्धेसाठी आयचर टॅम्पो (कँटर) भाडे (इंधनासह) - रुपये २०,०००/- x ९० दिवस	१८,००,०००/-
२.	कँटर वर पु. ल. जत्रोत्सव माहिती उभारणी खर्च	५,००,०००/-
३.	एल. ई. डी. उभारणी - रुपये १०,०००/- x ९० दिवस	९,००,०००/-
४.	ध्वनी व्यवस्था - रुपये ५,०००/- x ९० दिवस	४,५०,०००/-
५.	प्रकाश व्यवस्था व जनरेटर खर्च - रुपये १२,०००/- x ७० दिवस	८,४०,०००/-
६.	छयाचित्र खर्च - रुपये २,०००/- x ३६ दिवस	७२,०००/-
७.	कारागीर, समन्वयक तसेच तंत्रज्ञ यांचा चहापान, अल्पोपहार, भोजन, निवास खर्च - रुपये ५,०००/- x ९० दिवस	४,५०,०००/-
८.	सदरील रथाच्या सादरीकरणासाठी समन्वयक तसेच सहा. समन्वयक मानधन - रुपये १२,०००/- x ३६ दिवस	४,३२,०००/-
९.	इतर अनुषंगिक खर्च	२,००,०००/-
	एकूण	**५६,४४,०००/-**
	वस्तू सेवा कर (१८%)	**१०,१५,९२०/-**
	एकूण	**६६,५९,९२०/-**

२. शासन मान्यतेने ई-निविदा प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर वित्तीय मान्यता प्रदानाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा.

३. सदरचा खर्च विभागाचे मागणी क्र. झेडडी-२, २२०५ कला व संस्कृती, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, (०२) (०२), राज्य, नृत्य, नाटय, तमाशा व संगीत महोत्सव (२२०५ १५०७) -५० इतर खर्च या लेखाशीर्षाखालील मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-तीन, अ.क्र.४ परिच्छेद क्र. २७ (२) (अ) अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर प्रकरणी वित्त विभागाच्या शासन परिपत्रक, दिनांक १ एप्रिल, २०१९ मधील परिच्छेद क्र. ३,१३,१४ ची पुर्तता होत आहे. तसेच उर्वरित सर्व परिच्छेद व परिशिष्टातील अटी या प्रकरणी लागू होत नाहीत.

६. वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक १ एप्रिल, २०१९ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या निधीमधून विभागास खर्च करण्याच्या अधिकारानुसार सदर खर्च मंजूर करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात येत असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०६२११२३३५१८१२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित केलेला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Vilas Ramrao Thorat
Date: 2019.06.21 12:31:51 +05'30'

(विलास रा. थोरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
३. मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई ३२
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ३२
५. प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्य विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ३२
६. उप सचिव (सां.का.४), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ३२
७. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
८. महालेखापाल- १, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई
९. महालेखापाल- १, (लेखापरीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०.महालेखापाल- २, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, नागपूर
११.महालेखापाल- २, (लेखापरीक्षा) महाराष्ट्र राज्य, नागपूर
१२ अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१३ निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१४ निवड नस्ती, सां.का.४.